CNR MHAK-01-002480-2023

फौ.अपील क्र.१४४/२०२३
सिताराम काळे -वि- दिनेश कृपलानी

निशाणी ५ खालील आदेश
( दिनांक ०८.०८.२०२३ )

निशाणी ५ वरील अर्ज वाचला. सदर अर्जाद्वारे संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक ५०९६/२०१९ कामी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्रमांक ३, अकोला यांनी आरोपीस चलनक्षम दस्तऐवज अधिनियमाच्या कलम १३८ नुसार गुन्ह्याकरीता दोषी धरून एक महिना साध्या कैदेची शिक्षा व रूपये २५,०००/- नुकसान भरपाईपोटी फिर्यादीस द्यावे न दिल्यास २ महिने साध्या कारावासाची कैदेची शिक्षा सुनाविली आहे.

२. सदर न्यायनिर्णयावर नाराज होवून अपिलार्थी/मुळ आरोपीने सदरचे अपिल दाखल केले असून प्रस्तुत अर्जाद्वारे संपरीक्षा न्यायालयाने सुनावलेली शिक्षा अपिलाच्या निकालापावेतो संस्थगीत (suspend) करण्याची विनंती केली आहे.

३. वरील परिस्थितीत अपिलमेमोमध्ये उपस्थित मुद्दे विचारात घेता संपरीक्षा न्यायालयाच्या न्यायनिर्णयास अपिलार्थी/मुळ आरोपीने आव्हान दिले असून सदर अपिल गुणावगुणांवर चालुन निकाली होण्याकरीता अपिल प्रलंबीत काळात अपिलार्थी/मुळ आरोपीस सुनावलेली कैदेची व दंडाची शिक्षा काही अटी व शर्तीवर संस्थगीत (suspend) करणे न्यायोचीत होईल. सदर शिक्षा काही अटीवर संस्थगीत न केल्यास अपिल निष्फळ होणार आहे. तसेच अपिलार्थीतर्फे वकीलांनी नुकसान भरपाईच्या रकमेच्या २० टक्के इतकी रक्कम जमा करण्यास तयार असल्याचे तोंडी सांगीतले आहे. या परिस्थितीत अपिलार्थीतर्फे वकीलांचा युक्तीवाद तसेच चलनक्षम दस्तऐवज अधिनियमाच्या कलम १४८ मधील तदतुद विचारात घेता निशाणी ५ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामूळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

अपिलार्थी/आरोपी यांस संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक ५०९६/२०१९ कामी चलनक्षम दस्तऐवज अधिनियमाच्या कलम १३८ नुसार गुन्ह्याकरीता सुनावलेली substantive शिक्षा तसेच त्याने रूपये २५,०००/- नुकसान भरपाईपोटी फिर्यादीस द्यावे यांस याद्वारे अपिलार्थी/आरोपी याने नुकसान भरपाईपोटी द्यावयाच्या रकमेपैकी २० टक्के रक्कम या न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर अपिलाच्या निकालापावेतो संस्थगीत (suspend) करण्यात येत आहे.

अपिलार्थी/आरोपीने रू.१५,०००/-चा वैयक्तीक जातमूचलका व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा. अपिलार्थी/आरोपीने वरीलप्रमाणे आदेशाची पुर्तता केल्यानंतर संपरीक्षा न्यायालयास त्याबाबत त्वरीत कळविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUNIL MARUTIRAO PATIL
Date: 2023.08.08 16:29:20 +0530

अकोला ( सुनिल मा. पाटील )
दिनांक : ०८.०८.२०२३ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला.

...

*Certificate*

*The contents of this PDF file are same word for word as per original order.*

*Name of the Steno : A.R.Raipure, Stenographer Grade-1*
*Court's name : District Judge III & Addl. Sessions Judge, Akola.*
*Date of decision : 08.08.2023*
*Signed by P O on : 08.08.2023*
*Uploaded on : 08.08.2023*